ePaper

“भाजपा मित्रपक्षांना वापरून फेकून देते”, बच्चू कडूंचा गंभीर आरोप



| वर्ष - 7 । अंक - 279 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- दुसऱ्या दिवसावर इंग्लंडचे वर्चस्व!
- मी हॉलीवूडमध्ये करेन काम
- १ जुलैपासून तीन फौजदारी कायदे
- ७५ नाट्यगृहे अद्ययावत करणार


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 25 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# उद्योगांच्या विकासासाठी सरकारचे प्रयत्न!

## » उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : ‘महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो’चे उद्घाटन

## » सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करणार...

। पिंपरी । महाईन्यूज

**देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील पहिल्या ‘महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो’चे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रात संरक्षण उद्योगाला चालना देण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येईल आणि या क्षेत्रातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



मोशी येथील इंटरनॅशनल एक्झिबिशन ॲण्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले.जनरल अजय कुमार सिंग, एअर मार्शल विभास पांडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, महेश शिंदे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, निबे लि.चे गणेश निबे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात २०१७ मध्ये एअरोस्पेस आणि डिफेन्स धोरण तयार केले आणि या क्षेत्राला चालना देण्यासाठी १ हजार कोटीचा निधी तयार करण्यात आला. त्यातून ६०० एमएसएमई तयार झाल्या आहेत. केवळ ३०० कोटीतून १२ ते १५ हजार कोटींचे मूल्य या उद्योग संस्थांनी तयार केले. आज जगातले सगळे देश संरक्षण क्षेत्रात भारतासोबत काम करण्यास तयार आहेत. या पार्श्वभूमीवर संरक्षण क्षेत्रातील एमएसएमईसाठी अधिक सुविधा आणि सवलती देण्याचे धोरण स्वीकारण्यात येईल. रोजगार निर्मितीसोबत चांगली शस्त्रास्त्रे राज्यात तयार होतील याचेही प्रयत्न करू, असे श्री.फडणवीस म्हणाले.

‘मेक इन इंडिया’ मुळे देशाची संरक्षण सिद्धता वाढली..प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाची शक्ती ओळखली. आपला देश शस्त्रास्त्रांसाठी परदेशावर अवलंबून होता. आज जगाच्या पाठीवर सामरिक शक्तीत पहिल्या पाचमध्ये असलेले देश स्वत:ची संरक्षण सामग्री स्वत:च्या देशात तयार करून जगाला निर्यात करतात. हीच क्षमता देशात निर्माण करण्यासाठी ‘मेक इन इंडिया’ वर भर देण्यात आला. भारताने शस्त्र निर्यात करणाऱ्या देशांसाठी त्याचा काही भाग भारतात उत्पादन करावा लागेल आणि निर्मिती तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करावे लागेल अशी अट ठेवली. म्हणून देशात संरक्षण उत्पादन क्षमता निर्माण झाली.

### पुणे देशाच्या सामरिकदृष्टीने महत्वाचे केंद्र..

**» पुणे हे भारताच्या सामरीक शक्तीच्याद्दष्टीने महत्वाचे केंद्र असून गेल्या अनेक वर्षात संरक्षण उत्पादनाची चांगली व्यवस्था पुण्यात निर्माण झाली आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रणी आहे. देशाच्या वायुसेनेचे मेंटेनन्स कमांड, लष्कराचे दक्षिण कमांड, नौदलाचे मुंबई डॉकयार्ड महाराष्ट्रात आहे. नाशिकमध्ये हिंदुस्थान एअरोनॉटीकल्समध्ये तेजस आणि सुखोई अशी लढाऊ विमाने तयार होतात, माझगाव डॉकमध्ये जहाज बांधणीची आधुनिक व्यवस्था आहे, भारत इलेक्ट्रॉनिक्ससारखी संरक्षण क्षेत्रात उच्च तंत्रज्ञानयुक्त काम करणारी यंत्रणा आपल्याकडे आहे. अमरावतीजवळ बीडीएल मिसाईल उत्पादन युनिट सुरू होत आहे. चंद्रयान-३ करता भंडाऱ्याच्या ऑर्डीनन्स फॅक्टरीमध्ये काही भाग बनले. राज्यात ११ ऑर्डीनन्स फॅक्टरी, ५ डिफेन्स पीएसयु, ८ विविध प्रकारच्या प्रयोगशाळा आहे. पुण्यात डिआरडीओची सर्वोत्तम सुविधा आणि देशाची महत्वाची राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीदेखील आहे. म्हणून एमसएसमईसाठी महत्वाचे स्थान महाराष्ट्र आहे आणि राज्यात पुणे आहे.**

---

# एच. ए. मैदानावर हस्तकला कारागीर ते थेट ग्राहक विक्री प्रदर्शन

## » सारनाथ स्तूप, प्राचीन मंदिरे ही हस्तकलेचा प्राचीन वारसा – गिरीश प्रभुणे

। पिंपरी ।महाईन्यूज ।

सारनाथ स्तूप आणि देशभरातील प्राचीन मंदिरे, गुहा, लेण्या, अजिंठा, वेरूळसारखी जागतिक वारसा असणारी ठिकाणे ही तत्कालीन शिल्पकला आणि हस्तकलेचा प्राचीन वारसा आहेत. या कला जपणे आणि पुढच्या पिढीकडे देत रोजगार निर्मितीसाठी राष्ट्रीय गांधी शिल्प बाजारसारखी प्रदर्शने देशभर मोठ्या संख्येने व्हावीत, अशी अपेक्षा गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केली. भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालय, विकास



आयुक्त कार्यालय (हस्तकला) यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय गांधी शिल्प बाजारच्या वतीने पिंपरीत शुक्रवार पासून राष्ट्रीय हस्तकला आणि हातमाग प्रदर्शनाचे व विक्री दालनाचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार आण्णा बनसोडे, पिंपरी चिंचवड मनपाचे आयुक्त शेखर सिंह, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार (हस्तकला), वरिष्ठ सहाय्यक निर्देशक चंद्रशेखर सिंग, जिव्हाळा महिला विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्ष कविता खराडे आदी उपस्थित होते. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांनी देशभरातून आलेल्या हस्त कारागीरांचे शहर वासियांच्या वतीने स्वागत केले.

भारत सरकार (हस्तकला), वरिष्ठ सहाय्यक निर्देशक चंद्रशेखर सिंग यांनी सांगितले की, या राष्ट्रीय प्रदर्शनात देशातील विविध २९ राज्यातील ३५० कारागीर २५० स्टॉलसह पुण्यातील ११ आणि पिंपरी चिंचवड शहरातील ४ स्टॉल सह महाराष्ट्रातील एकूण ५० स्टॉलवर हस्तकला कारागीर पारंपारिक कलाकृती या प्रदर्शनात सादर केली आहे.

### विविध प्रकारच्या वस्तूंचे स्टॉल

» या प्रदर्शनात आर्ट मेटल वेअर, बीड्स क्राफ्ट, केन आणि बांबू उत्पादन, कार्पेट, शंख-शिंपले, बाहुली आणि खेळणी, भरतकाम आणि क्रोशेटेड वस्तू, काच, गवत, पाने, वेत वेळू आणि फायबर उत्पादन, हाताने छापलेले कापड स्कार्फ, इमिटेशन ज्वेलरी, ज्यूट क्राफ्ट, तंजावर पेंटिंग, टेक्सटाईल (भरतकाम), लाकडी वस्तू, कोल्हापुरी चप्पल, कोल्हापुरी ज्वेलरी क्राफ्ट, विविध पेंटिंग. छत्तीसगड डोकरा कास्टिंग, मधुबनी पेंटिंग, पंजाबची फुलकारी फॅब्रिक्स अशा विविध प्रकारच्या वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले आहेत.

# पुणे ट्रॅफिकमुक्त बनवण्याचा निर्धार

## सुनील देवधर: राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या जयंतीदिनी 'समरसता सेवा पुरस्कारांचे' वितरण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, २३ फेब्रुवारी रोजी पुण्यातील परीट समाजाच्या ज्येष्ठांचा तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचा 'समरसता सेवा पुरस्काराने' सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाची संकल्पना मांडणारे भाजपा नेते सुनील देवधर यांनी आपल्या मनोगतात ट्रॅफिक, प्रदूषणमुक्त पुण्याचा निर्धार व्यक्त केला. पुण्याला आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनस्थळ बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रित कार्य करूया असे आवाहन त्यांनी यावेळी केले.**




शुक्रवारी, वानवडी स्थित महात्मा फुले सांस्कृतिक भवनात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती समारोह समितीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमप्रसंगी माजी खासदार प्रदीप रावत, पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, माजी आमदार जगदीश मुळीक, युवा नेते कुणाल टिळक, अभिनेते अजिंक्य देव, ओबीसी शहर अध्यक्ष नामदेव माळवदे, सामाजिक समरसता मंचाचे नंदकुमार राऊत, संजय गाते, दिनेश होले, लहुजी वस्ताद समाधी समितीचे सुखदेव अडागळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने पुणेकर नागरिक उपस्थित होते.

संत गाडगेबाबा वर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट बनवणारे प्रसिद्ध ज्येष्ठ सिनेदिग्दर्शक पद्मभूषण राजदत्त आणि पुणे महापालिकेचे माजी उपमहापौर परीट समाजाचे नेते नाना नाशिककर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

राज्यसभेच्या नवनियुक्त खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी यांचा देखील विशेष अभिनंदनपर सन्मान करण्यात आला. यासमवेत १०० पेक्षा अधिक स्वच्छता करणाऱ्या हातांना यावेळी सन्मानित करण्यात आले. संत गाडगेबाबा यांनी समाज जागृतीचे मौलिक कार्य केले. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी बनवलेला 'देवकी नंदन गोपाला' हा चित्रपट पाहिला आणि गाडगेबाबा यांच्या विषयी अधिकची माहिती झाली.

### पुणेकरांचेच आशीर्वाद आहेत

» "राज्यसभा खासदार म्हणून मला पक्षाने संधी दिली असून, हे पुणेकरांचेच आशीर्वाद आहेत, येणाऱ्या काळात पुण्यातील कामासाठी प्रामाणिकपणे काम करेन", अशा भावना राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. यावेळी माजी उपमहापौर नाना नाशिककर म्हणाले की, "पुरस्कार देऊन ज्यांचा आज आपण सन्मान केला, ती सर्व मंडळी गेली अनेक वर्ष समाजाचे काम करत आहेत. गाडगेबाबांच्या विचारांचे हे कार्य असेच अविरत सुरु ठेवावे!" परीट समाजातील या स्वच्छता करणाऱ्या माता भगिनींना सन्मानित केल्याबद्दल त्यांनी सुनील देवधर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले! कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंदार खराडे यांनी केले.

त्याचप्रमाणे गाडगेबाबा यांच्याकडूनच प्रेरणा घेऊन तरूणांनी पंढरपूर वारी दरम्यान निर्मलवारी सुरु केली. याच पार्श्वभूमीवर आपणही स्वच्छता राखून, पुण्याला स्वच्छ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनस्थळ बनवूया, असा निर्धार सुनील देवधर यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहिलेले भाजपा राष्ट्रीय ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष डॉ. के. लक्ष्मण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या अनेक योजनांच्या माध्यमातून राष्ट्रसंत गाडगेबाबांचे स्वप्न कसे साकार करीत आहेत ते विस्ताराने सांगितले. यावेळी बोलताना माजी आमदार जगदीश मुळीक म्हणाले, " पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता अभियान सुरु केले. आता आपल्याला येणाऱ्या काळात २०२७ सालापर्यंत पुण्याला स्वच्छ शहर बनवायचे आहे. त्याचप्रमाणे पुणे शहरात सुनील देवधर सातत्याने काम करत आहेत. विविध कार्यक्रम राबवत आहेत. ते पुण्याचेच आहेत. प्रचारक म्हणून त्यांनी पुर्वोत्तर राज्यांत काम केले आहे. त्यासाठी त्यांचे अभिनंदन करतो."

---

# मोदींच्या 'गॅरंटी'ला 'तारीख' नाही! शरद पवार यांची टीका

## सत्तेचा वापर विरोधकांना तुरुंगात टाकण्यासाठी : शरद पवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र सरकार अनेक गोष्टींची हमी (गॅरंटी) देत आहे. मात्र त्यांच्या हमीला तारीख नाही आणि धनादेशही वठत नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. गेल्या सत्तर वर्षांत अनेक राज्यकर्ते पाहिले. भाजपचे अटलबिहारी वाजपेयी यांचेही सरकार पाहिले.**

मात्र गेल्या दहा वर्षांत मोदी यांची भूमिका देशाला दिशा देणाऱ्या व्यक्तींविषयी जनतेच्या मनात घृणा निर्माण करण्याची आहे. त्यामुळे लोकशाहीची चिंता वाटत आहे. नेहरू आणि त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ले करण्याचा आणि त्यांना बदनाम करण्याचा एककलमी कार्यक्रम मोदी यांचा आहे, असा आरोपही त्यांनी केला.

इंडिया आघाडीचा पहिला मेळावा शनिवारी काँग्रेस भवनात झाला. या मेळाव्यात पवार यांनी मार्गदर्शन केले. या मेळाव्याला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, ठाकरे गटाचे पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन अहिर, खासदार सुप्रिया सुळे, चंद्रकांत हंडोरे, आमदार रवींद्र धंगेकर, डॉ. विश्वजित कदम, काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय मोरे आणि गजनान थरकुडे उपस्थित होते.पवार म्हणाले की, सत्तेचा वापर विरोधकांना तुरुंगात टाकण्यासाठी आणि त्यांच्यावर दबाव टाकण्यासाठी केला जात आहे. विरोधी विचारावर घाव घालण्याचे काम सुरू आहे. हे चित्र बदलण्यासाठी आणि भाजपला पराभूत करण्यासाठी भविष्यातील संकटांची माहिती सामान्य माणसाला द्यावी लागणार असून भाजप विरोधी सर्व विचारधारांना त्यासाठी एकत्र यावे लागेल. देशाच्या विकासात भरीव योगदान असलेल्यांवर मोदी हल्ला करत असल्याचे त्यांच्या भाषणातून दिसते. नेहरू यांनी देश प्रगतीच्या पथावर नेला, हे संपूर्ण जग मान्य करत आहे. मात्र मोदींना ते अमान्य आहे. राज्यकर्ते सामान्यांच्या हिताचे रक्षण करणारे आहेत, असे वाटत नाही. देशाला पोसणारा शेतकरी संकटात आहे. दिल्लीच्या सीमेवर वर्षभर आंदोलन सुरू आहे. मात्र त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. नेहरू, गांधी आणि वाजपेयी यांचे सरकार असताना केंद्र आणि राज्यात समन्वय होता. मात्र गेल्या दहा वर्षांत राज्यांचा सन्मान केला जात नाही. त्यातच एखाद्या राज्यातील विचारधारा वेगळी असेल तर वेगळी भूमिका घेतली जाते. त्यामुळे प्रश्नही प्रलंबित राहत आहेत.



### आरोपांची श्वेतपत्रिका काढावी

» अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन, अनिल देशमुख, संजय राऊत यांना झालेली अटक ही कसा त्रास द्यायचा, याची उदाहरणे आहेत, असे पवार यांनी सांगितले.प्रशासनाला त्यांनी इशारा दिला.पटोले म्हणाले की, यंदा हुकूमशाही सरकार पराभूत होईल. सांविधानिक मूल्यांची मोडतोड करून राज्यातील सरकार सत्तेवर आले आहे. शेतकऱ्यांनी मोदींना सत्तेत आणले मात्र त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. मोदींची हमी म्हणून खोटे बोलण्याची हमी आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आणि ओबीसी समाजात वाद निर्माण केला जात आहे. धनगर समाजाचीही फसवणूक केली जात आहे.

# आयुक्त शेखर सिंह यांना 'नारळ'?

## चौथ्या टप्प्यात बदली होणार : प्रशासकीय हालचालींना वेग

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरू आहे. शुक्रवारी १२ बड्या अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली. तत्पूर्वी दोन टप्प्यांमध्ये प्रशाकीय खांदेपालट करण्यात आली होती. आता चौथ्या टप्प्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांचीही बदली होणार असून, त्यासाठी भाजपा, शिवसेनेच्या स्थानिक आमदार, खासदार नेत्यांनी मुंबईत खलबते सुरू केली आहेत.**






लोकसभा निवडणुका मुक्त आणि मोकळ्या तसेच पारदर्शी वातावरणात पार पडाव्यात यासाठी निवडणुक प्रक्रियेशी सबंधित महसूल आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने यापूर्वीच दिले आहेत. त्यानुसार एकाच पदावर तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण केलेल्या किंवा गृह जिल्हा असलेल्या पोलीस दलातील आयुक्त, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपायुक्त आदी तसेच जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार अशा महसूल अधिकाऱ्यांच्या बदल्या राज्य सरकारकडून केल्या आहेत. हा नियम आता महापालिका आयुक्तांनाही लागू करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांची बदली निश्चित मानली जाते. वाकड येथील १५०० कोटी रुपयांचा टीडीआर प्रकरणावरुन पिंपरी-चिंचवड शहराची राज्यभरात बदनामी झाली आहे. या प्रकरणात राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचा वरदहस्त असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. आयुक्त सिंग यांनी मनमानीपणे घेतलेल्या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला असून, त्यांना अभय दिल्यास आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आपल्या उमेदवारांना फटका बसेल, अशी शंका सेना-भाजपाच्या नेत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत उपस्थित केली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी "भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी अशा तीनही पक्षांना सोबत घेवून काम करेल, असा अधिकारी आपण देवूया... तुम्ही नाव सूचवा..." असे आश्वासित केल्या बोलले जाते.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचीही मुदतपूर्व बदली होणार, असे बोलले जात होते. मात्र, आयुक्त सिंग आणि राष्ट्रवादीचे स्थानिक आमदार अण्णा बनसोडे यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांची मध्यंतरी भेट घेतली. त्यामुळे आयुक्त आणि सत्ताधारी राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांमध्ये 'मनोमिलन' झाले, अशी चर्चा आहे. परंतु, आयुक्त सिंग आणि शिवसेना व भाजपाच्या स्थानिक नेत्यांमधील समन्वय बिघडला असून, आयुक्त आमदार-खासदारांनी पाठपुरावा केलेल्या विविध विकासकामांमध्ये जाणीवपूर्वक हयगय करीत आहेत. तशी तक्रार भाजपा-सेना खासदार व आमदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या दौऱ्याची फलश्रुती होणार आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

### राजेंद्र भोसले यांच्या नावाची चर्चा...



» विशेष म्हणजे, यांच्या नावाबाबत चर्चा सुरू आहे. कोरेगाव तालुक्यातील किन्हई येथील रहिवाशी असलेले आणि सातारा येथील सैनिक स्कुलचे माजी विद्यार्थी डॉ.राजेंद्र भोसले यांनी सातारा, सांगली, सोलापूर, पुणे आणि नवी मुंबई अशा ठिकाणी सेवा बजावली आहे. राष्ट्रवादीचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सेनेतील बड्या नेत्यासोबत भोसले यांचा सलोखा आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे आणि भाजपा-सेनेच्या स्थानिक नेत्यांनी डॉ. भोसले यांची पिंपरी-चिंचवडमध्ये आयुक्तपदी नियुक्ती करण्याबाबत खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे आणि आमदार अश्विनी जगताप यांच्यात एकमत झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे आयुक्त सिंग आणि त्यांची बदली... या बाबत महापालिका व राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

### भाजपा निष्ठावंत, संघ परिवाराकडूनही आयुक्तांवर आक्षेप...

» भाजपाचे माजी संघटक अमोल थोरात यांनीही आयुक्त सिंग यांच्या कारभाराविरोधात रान पेटवल्याचे सर्वश्रूत आहे. भाजपा निष्ठावंत आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात थोरात यांचा प्रभाव आहे. वाकड टीडीआर कथित घोटाळा आणि आयुक्त भवनमधील पूजाविधीच्या मुद्यावरुन थोरात यांनी व्यंगचित्र काढून आयुक्त सिंह यांची बदली करा अशी मागणी पक्षश्रेष्ठी आणि थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. तसेच, भाजपा आणि शिवसेना स्थानिक, आमदार खासदारांनी आयुक्त सिंग यांच्या कार्यपद्धतीबाबत तक्रार केली आहे. आमदार, खासदारांनी सुचवलेली विकास कामे करण्यासाठी दिरंगाई, टाळाटाळ आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांना 'रेड कार्पेट' अशी भूमिका घेतल्यामुळे आयुक्त सिंह रडारवर आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांना विश्वासात घेवून आगामी निवडणुकीच्या दृष्टीने मर्जीतील अधिकारी पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्तीपदी नियुक्त करण्याचा निर्णय झाला असून, सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत चौथ्या टप्प्यात आयुक्त सिंग यांना 'निरोपाचा नारळ' मिळणार, असे चित्र आहे.

---

# भारत विकसित राष्ट्र करण्यासाठी नारी शक्तीने मोदींना साथ द्यावी !

## शंकर जगताप: मोदी सरकारने गेल्या 10 वर्षांत अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार देशातील या चार घटकांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यात देशातील गरीब, तरूण, शेतकरी आणि महिलांचा समावेश आहे. या चार जातींचा विकास होईल तेव्हाच देशाचा विकास होईल, यावर मोदी सरकारचा विश्वास आहे. या चारही घटकांच्या विकासासाठी मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. भारत विकसित राष्ट्र करण्यासाठी नारी शक्तीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्यावी, असे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.**



पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात नारी शक्ती वंदन अभियान कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.शंकर जगताप म्हणाले, "नरेंद्र मोदी हे या देशाचे पंतप्रधान झाल्यापासून महिलांचा विकास हा केवळ कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता देशाच्या विकासगाथेच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. भारताच्या प्रगतीमध्ये महिलांनी बजावलेल्या भूमिकेला पंतप्रधान मोदी यांनी कायमच वंदन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प केला आहे. हा संकल्प साध्य करण्यासाठी देशातील महिला शक्ती ही सर्वात मोठी हमी असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले आहे. मोदी सरकार महिला सबलीकरण प्रक्रिया अविरत चालवित आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील हे सरकार विविध प्रभावी योजना व उपक्रमांद्वारे महिला सक्षमीकरणासाठी महिलांना सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने काम करत आहे. महिलांचे सक्षमीकरण ही मोदींची गॅरंटी आहे.

### राजेंद्र भोसले यांच्या नावाची चर्चा...

» मोदी सरकार लखपती दिदी बनविण्याची योजना राबवित आहे. त्याअंतर्गत देशातील बचत गटातील एक कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्यात आले आहे. आता तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्याचे सरकारचे टार्गेट आहे. तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील महिलांकडून पाठिंबा मागितला आहे. देशाला विकसित राष्ट्र करताना या तीन कोटी महिलांचे मोठे योगदान असणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील महिलांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्यावी, असे आवाहन शंकर जगताप यांनी केले."

# हिंसेचे मणिपूरचक्र पश्चातबुद्धीने थांबेल?




**मणिपूरमध्ये गेल्या वर्षीपासून सुरू असलेल्या वांशिक हिंसाचाराला कारणीभूत ठरलेल्या आदेशात उच्च न्यायालयानेच आता दुरुस्ती केल्याने या राज्यातील जनजीवन पूर्वपदावर येण्यास मदत व्हावी ही अपेक्षा. 'मैतेई समाजाचा अनुसूचित जमाती म्हणजेच आदिवासींमध्ये समावेश करण्याबाबत मणिपूर सरकारने तात्काळ विचार करावा' असा आदेश गेल्या.**

वर्षी २७ मार्चला मणिपूर उच्च न्यायालयाच्या तत्कालीन हंगामी मुख्य न्यायमूर्तींनी दिला होता. या आदेशाची मणिपुरात वांशिक हिंसाचार पेटला. त्यात आजवर २०० हून अधिक जीव गेले तर हजारो लोक विस्थापित झाले. याशिवाय मैतेई आणि कुकींमध्ये शत्रुत्वाची भिंत उभी राहिली. कटुता एवढी टोकाला गेली की, मैतेई समाज कुकी समाजाचे प्राबल्य असलेल्या डोंगरखोऱ्यात प्रवेश करू शकत नाहीत तसेच कुकी मैतेई समाजाचे वर्चस्व असलेल्या राजधानी इम्फाळमध्ये ये-जा करू शकत नाहीत. राज्यात ५२ टक्के लोकसंख्या असलेला मैतेई समाज आदिवासींच्या आरक्षणात वाटेकरी होणार ही बाबच कुकी, झो आदी समाजांच्या मुळावर येणारी होती. मराठा समाज आरक्षणात वाटेकरी झाल्यास हक्काच्या आरक्षणावर अतिक्रमण झाल्याची जशी भावना ओबीसी समाजात आहे तशीच ही मणिपुरातली भावना.



यातून वांशिक संघर्ष पेटला. तो आटोक्यात आणण्यात केंद्र व मणिपूरमधील भाजप सरकारला सपशेल अपयश आले. मणिपूर उच्च न्यायालयाच्या आरक्षणाच्या आदेशावर सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी कोरडे ओढले होते. पण सर्वोच्च न्यायालयाने आदेशाला स्थगिती दिली नव्हती. उच्च न्यालायाने आदेशात दुरुस्ती करताना 'मैतेईंचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याचा परिच्छेद वगळला. वांशिक संघर्ष कमालीचा टोकाला गेला असताना न्यायालयाच्या आदेशानंतर दोन्ही समाजांतील संबंध सुधारणे इतक्यात तरी शक्य दिसत नाही. दोन जमातींत तेढ निर्माण झाल्यास सरकारने मध्यस्थाची भूमिका पार पाडणे जरुरीचे असते. पण भाजपने सरळसरळ बहुसंख्य मैतेई समाजाची बाजू उचलून धरल्याने संघर्ष अधिकच धगधगत राहिला. कुकी समाजातील दोन महिलांची मैतेईंकडून नग्न धिंड काढल्याची चित्रफीत समाजमाध्यमातून प्रसारित झाल्यावर अधिकच संतप्त प्रतिक्रिया उमटली होती.आरक्षणाच्या आदेशात न्यायालयानेच दुरुस्ती केल्याने मैतेई समाजावर अन्याय झाल्याचा सल या समाजात कायमच राहील. कारण वर्षानुवर्षे ही मागणी केली जात होती. देशात सर्वच राज्यांमध्ये विविध समाजांच्या आरक्षणाचा विषय वादग्रस्त ठरला आहे. महाराष्ट्रातील घडामोडी ताज्याच आहेत पण काही वर्षांपूर्वी गुजरातमध्ये पाटीदार पटेल समाजाच्या आरक्षणाच्या आंदोलनाला विशेषत: सौराष्ट्रात हिंसक वळण लागले होते. शेवटी पाटीदार पटेल समाजाची नाराजी दूर करण्याकरिता गुजरातमधील भाजप सरकारने आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाला १० टक्के आरक्षण लागू करण्याचा कायदा केला. पण गुजरात उच्च न्यायालयाने पटेल समाजाचे १० टक्के आरक्षण रद्दबातल ठरविले होते. हरयाणात जाट, राजस्थानमध्ये गुज्जर किंवा आंध्र प्रदेशात कप्पू समाजाच्या आरक्षणाच्या आंदोलनाला वेळोवेळी हिंसक वळण लागले. कोणत्याही समाजाचे आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकू शकलेले नाही. इंद्रा सहानी खटल्यात आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल केली जात नाही तोपर्यंत कोणत्याही समाज घटकांचे आरक्षण न्यायालयात टिकणे कठीण आहे. तरीही, कोणत्याही समाज घटकाची निवडणुकीच्या तोंडावर नाराजी ओढवून घेणे राजकीय नेतेमंडळींना शक्य नसल्याने जशी मागणी येत जाते तशी सत्ताधारी मंडळी दबावाला बळी पडतात. मणिपूरचा तिढा याहूनही कठीण आहे. तेथील वांशिक संघर्षात मुख्यमंत्री बिरेन सिंह यांची भूमिका वादग्रस्त होती. वास्तविक संघर्ष हाताबाहेर गेल्यावर मुख्यमंत्र्यांना बदलणे आवश्यक होते. पण भाजपने बहुसंख्य असलेल्या मैतेई समाजाची नाराजी नको म्हणून मुख्यमंत्र्यांना पदावर कायम ठेवले. मणिपूर कायम धगधगता राहणे हे देशाच्या हिताचे नाही. उच्च न्यायालयाने वादग्रस्त निकालात दुरुस्ती केल्याने दोन्ही समाजांमध्ये तोडगा काढण्याच्या उद्देशाने प्रयत्न व्हायला हवेत.

## संपादकीय »

### बदमाषांतले शरीफ!

***नवाझ यांच्याऐवजी त्यांचे बंधू शाहबाज पाकिस्तानच्या पंतप्रधानपदी आणि भुत्तोझरदारींच्या पक्षाचा बाहेरून पाठिंबा, हा समझोता लष्करधार्जिणाच!***

वर्षानुवर्षांच्या दडपशाही आणि हडपशाहीविरोधात पाकिस्तानी जनतेने ८ फेब्रुवारी रोजी दिलेला काहीसा अनपेक्षित कौल आणि त्यातून उसळलेली चैतन्यलाट औट घटकेची ठरणार अशी भीती होती. घडलेही तसेच. 'बॅट' हे चिन्ह हिरावल्यानंतरही पाकिस्तानातील युवा मतदारांची दिशाभूल झाली नाही. पाकिस्तान मुस्लीम लीग- नवाझ (पीएमएल-एन) आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) या राजकीय खानदानचालित पक्षांना त्यांचे मोजके निष्ठावान मतदार वगळता बाकीच्यांनी नाकारले.जणू ठरवूनच टाकल्याचे दिसताच, जाणत्या मतदारांनी त्यांचे मनसुबे उधळून लावण्यासाठीदेखील मतदान केले. परिणामी एके काळच्या दोन बलाढ्य पक्षांना पाकिस्तानात सत्तास्थापनेसाठी परस्परांचे खांदे आणि लष्कराच्या कुबड्यांचा आधार घ्यावा लागत आहे.

'जंगल' शब्दाची व्याख्याच बदलून दिखाऊ विकासाच्या नावावर 'रान मोकळे' करून देण्याचा डाव, सर्वोच्च न्यायालयाने एका अंतरिम निर्णयाने नुकताच थोपवला आहे. सजग नागरिकांनी हा सर्व प्रकार समजून घ्यायला हवा. याचे कारण जंगले हा कोट्यवधी लोक अवलंबून असणारा मूलस्रोत आहे.

# 'जंगलच्या कायद्या'तून वनांची तूर्त सुटका

आजवर अनेकदा भारतीय निसर्ग-पर्यावरण विनाशकारी शासकीय निर्णयांमुळे धोक्यात आले. बहुतांश वेळी पर्यावरणाची खंबीरपणे पाठराखण केली ती सर्वोच्च न्यायालयानेच. गेल्या आठवड्यातील निर्णय हे त्याचे ताजे उदाहरण. दिखाऊ विकासाच्या नावावर केंद्र सरकारचा 'जंगल' शब्दाची व्याख्याच बदलून धनदांडग्यांना शब्दशः 'रान मोकळे' करून देण्याचा डाव न्यायालयाने एका अंतरिम निर्णयाने थोपवला. जंगले हा आपला सर्वाधिक महत्वाचा, कैक कोटी लोक अवलंबून असणारा आणि हवामानबदल थोपवणारा मूलस्रोत आहे. भारतात फक्त २१% भूभागावर वने शाबूत आहेत,त्यातली फक्त १२.३७% सलग,अनाघ्रात निबिड/घनदाट किंवा दाट आहेत.अशा व्याख्या-बदलामुळे ह्या सर्व जंगलांपैकी २८% वनांचे संरक्षण निकाली निघून ती मानवी धंदे करण्यासाठी मोकळी होत होती.अभ्यासूपणे केलेले पर्यावरणविषयक कायदे



बदलून किंवा त्यांना वळसा घालून विकासाच्या नावाखाली सरकारकडून निसर्ग-पर्यावरणाचा विनाश चालू आहे. त्यातली पुढची कडी म्हणजे १९८० चा 'वन संवर्धन कायदा' बदलणारा नवा कायदा २०२३ मध्ये सरकारने प्रस्तावित केला होता.तो गेल्या जुलै-ऑगस्टमध्ये संसदेत मंजूरही झाला होता. बदलाची उद्दिष्टे स्पष्ट करताना सरकारने त्याची व्याप्ती, सर्वोच्च न्यायालयाच्याच आधीच्या एका पथदर्शी निर्णयातील जंगल शब्दाच्या व्याख्येमुळे अवाजवी वाढते आहे ,असे विधान केले होते. हा आधीचा निर्णय म्हणजे 'गोदावर्मन तिरूमलपाद विरुद्ध भारत सरकार-१९९६' या निकालात केलेली वन शब्दाची व्याख्या.महिलांचा लैंगिक छळ रोखणाऱ्या 'विशाखा विरुद्ध राजस्थान सरकार' या खटल्याच्या निकालाला जे स्थान भारतीय महिलांच्या सक्षमीकरणात आहे, तेच स्थान भारतीय पर्यावरणात गोदावर्मन निकालाला आहे. साहजिकच या नव्या वनसंवर्धन कायद्यातील तरतुदींना आव्हान देणारी याचिका निवृत्त वनाधिकाऱ्यांच्या संघटनेने 'वनशक्ती' आणि 'गोवा फाऊंडेशन' या संस्थांसमवेत सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. त्याच्या सुनावणीदरम्यान जंगलाची व्याख्या अशी बदलायला न्यायालयाने प्रतिबंध केला. आता पुढील सुनावणी जुलै २०२४ मध्ये आहे;पण त्याआधी केंद्र,राज्य आणि पर्यावरण मंत्रालय यांना सर्वोच्च न्यायालयाने काही स्पष्ट आदेश दिले आहेत. त्यांचे तपशील पाहण्याआधी गोदावर्मन निकाल सरकारला इतका का खुपतो ते पाहू.भारतीय वने आणि जंगले यांत कोणतीही वनेतर उठाठेव/उपद्व्याप करण्यास सदर निकाल प्रतिबंध करतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 75 नाट्यगृहे अद्ययावत करणार!

## शंभर वर्षात नाट्यक्षेत्राला वाव मिळाला : मुख्यमंत्री

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नाट्य संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी राज्यात ७५ नाट्यगृहे अद्ययावत करण्यात येणार आहेत. यामध्ये ५२ नाट्यगृहांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार असून उर्वरित नाट्यगृहे नव्याने उभारण्यात येणार आहेत . ती सर्व सुविधा संपन्न असावीत व परिपूर्ण असावी यासाठी अकरा तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**



रंगभूमी मध्यवर्ती संघटना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे शंभरावे विभागीय नाट्य संमेलन महाबळेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराज नाट्य नगरी या ठिकाणी होत आहे. याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, आमदार मकरंद पाटील, संमेलन अध्यक्ष जब्बार पटेल, माजी संमेलन अध्यक्ष मोहन जोशी, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले,नाट्य संमेलनाला शंभर वर्ष होत आहेत. मागील शंभर वर्षात महाराष्ट्राच्या कला आणि नाट्यक्षेत्राला वाव मिळाला.यातून राज्याची सांस्कृतिक श्रीमंती दिसून येते.हि नाट्य चळवळ टिकवून ठेवणाऱ्या राज्यातील चोखंदळ प्रेक्षकांचेही मुख्यमंत्र्यांनी आभार मानले. अनेक थोर कलाकारांच्या योगदानातून मराठी रंगभूमी बहरली. नाट्य रसिकांच्या पसंतीस उतरण्यासाठी काळानुरूप रंगभूमीने अनेक बदल स्वीकारले. त्यामुळेच व्यावसायिक सोबत प्रायोगिक रंगभूमीलाही चोखंदळ रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे. अनेक अडचणींवर मात करत सध्या मराठी रंगभूमी पुढे जात आहे. अशावेळी नाट्यसंमेलनांसारखे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, अशा नाट्यसंमेलनांमधून नवकलाकार उदयास आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य घडते. यातूनच स्थानिक कलाकारांना मंच उपलब्ध होतो. महाबळेश्वर येथे होत असलेल्या विभागीय नाट्यसंमेलनाप्रमाणेच राज्याच्या विविध जिल्ह्यांमध्ये नाट्य संमेलने होत आहेत. यातून गौरवशाली नाट्य संस्कृतीचा विस्तार दिग्गज कलाकार करत आहेत. नाट्यकलेमध्ये कार्य करणारे कलाकार हे सेवाभाव घेऊन नाट्य संस्कृती जोपासत असतात. कलेला जेंव्हा रसिक दाद देतात तेव्हांच कलाकार कला समृद्ध करू शकतो. यावेळी त्यांनी जेष्ठ कलाकार अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण देऊन महाराष्ट्र शासनाने गौरव केल्याचेही सांगितले.मुख्यमंत्री म्हणाले, महाबळेश्वर येथे दोन हजार प्रेक्षक क्षमतेचे नाट्यगृह असून ते सध्या बंद स्थितीत आहे. हे नाट्यगृह पुन्हा सुरू करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देण्याची सूचनाही त्यांनी केली. मुंबई येथील फिल्म सिटी आंतरराष्ट्रीय दर्जाची फिल्म सिटी करण्यात येणार आहे. मराठी भाषा व नाट्य चळवळ यांना बळ देण्यासाठी शासन नेहमीच सकारात्मक असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांनी, विविध कलांसाठी सर्वांगीण आणि एकात्मिक, परिपूर्ण असे एकच व्यासपीठ असले पाहिजे. त्यासाठी विचारवंत, कलावंत, आणि रसिक यांची समिती स्थापन करून कलेच्या उत्थापनासाठी कार्य व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी प्रशांत दामले यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नरेश गडेकर, भाऊसाहेब भोईर, अजित भुरे, सतीश लोटके यांच्यासह विविध दिग्गज मान्यवर, कलाकार, नाट्य परिषदेचे पदाधिकारी, रसिक आदी उपस्थित होते.

### काळानुरूप रंगभूमीने अनेक बदल

रंगभूमी मध्यवर्ती संघटना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे शंभरावे विभागीय नाट्य संमेलन महाबळेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराज नाट्य नगरी या ठिकाणी होत आहे. याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, आमदार मकरंद पाटील, संमेलन अध्यक्ष जब्बार पटेल, माजी संमेलन अध्यक्ष मोहन जोशी, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले,नाट्य संमेलनाला शंभर वर्ष होत आहेत. मागील शंभर वर्षात महाराष्ट्राच्या कला आणि नाट्यक्षेत्राला वाव मिळाला.यातून राज्याची सांस्कृतिक श्रीमंती दिसून येते.हि नाट्य चळवळ टिकवून ठेवणाऱ्या राज्यातील चोखंदळ प्रेक्षकांचेही मुख्यमंत्र्यांनी आभार मानले. अनेक थोर कलाकारांच्या योगदानातून मराठी रंगभूमी बहरली. नाट्य रसिकांच्या पसंतीस उतरण्यासाठी काळानुरूप रंगभूमीने अनेक बदल स्वीकारले.

# बिबट्याचा थरार; सहा तासांनंतर पकडण्यात यश

## नगरच्या इतिहासात प्रथमच बिबट्याचा वस्तीमध्ये घुसून धुमाकूळ

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नगर शहराच्या इतिहासात प्रथमच बिबट्याने नागरी वस्तीमध्ये घुसून धुमाकूळ घातला. पुणे रस्त्यावरील केडगाव उपनगराच्या अंबिकानगर या दाट मध्यवस्तीच्या भागात तब्बल सहा तास बिबट्याने मुक्काम ठोकला होता.**





बिबट्याच्या हल्ल्यात तिघे जखमी झाले, तर या वेळी झालेल्या पळापळीमध्येही काही जण जखमी झाले. सकाळी १० ते १०.३० च्या सुमारास सुरू झालेले हे थरार व भयनाट्य सायंकाळी ४.३० च्या सुमारास बिबट्याला जेरबंद केल्यानंतर संपले आणि नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.जिल्ह्यात उसाची शेती असलेल्या उत्तर भागात अनेक वेळा बिबट्याने हल्ला केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यात अनेकदा पशुधनाला, तर काहींना जिवाला मुकावे लागले आहे. मात्र, नगर शहरात बिबट्याचे अस्तित्व प्रथमच दिसले. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती.बिबट्याच्या हल्ल्यात अरुण चौरे, दीपक धस, प्रशांत गारकर असे तिघे जखमी झाले. बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. बिबट्या मागे लागल्याने झालेल्या पळापळीत काहीजण धावताना पडून, कुंपणावरून उड्या मारताना पडून किरकोळ जखमी झाले. बिबट्याच्या मागे मोठा जमावही लागला होता. काही जण त्याला दगडही मारत होते. बिबट्याच्या मोठ्या डरकाळ्यांनी मोठी घबराट पसरली होती. बिबट्या जेरबंद करण्यास उशीर झाल्याने परिसरातील प्राथमिक शाळा सोडण्यास पोलिसांनी मज्जाव केला होता. त्यामुळे विद्यार्थी शाळेतच थांबून होते.केडगाव उपनगरातील शिवाजी मंगल कार्यालयामागील अंबिकानगरचा भाग स्वतंत्र बंगले व दाट वस्तीचा आहे. बंगल्यांना कुंपण आहे, तसेच आवारात मोठी झाडीही आहेत. दोन वेळा बिबट्या झाडावरही चढला. अनेक तरुणांनी जाळ्या घेऊन त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. बिबट्याला लपण्यास कुंपण, झाडीचा आधार मिळत होता. तसेच जमावाच्या पळापळीमुळे तो सारखा जागा बदलत होता. त्यामुळे त्याला पकडण्यास वेळ लागत होता. संगमनेरहून आलेल्या वन खात्याच्या रेस्क्यू पथकाने त्याला भुलीचे इंजेक्शन बंदुकीच्या माध्यमातून दिले.

### दुकानेही बंद झाली होती

बिबट्याच्या दहशतीने अंबिकानगर परिसरातील अनेक कुटुंबे दरवाजा, खिडक्या बंद करून घरात बसले होते. दुकानेही बंद झाली होती. लहान मुलांना घराबाहेर सोडले जात नव्हते. बिबट्याच्या मागे लागलेल्या जमावावरील नियंत्रणासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागत होती.

# 1 जुलैपासून तीन फौजदारी कायदे!

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्यास होणार फाशी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) , भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर करून ती मंजूर करून घेतली होती. त्यानंतर राष्ट्रपतींनीही या कायद्यांना संमती दिली. हिट अँड रन प्रकरणात जी तरतूद होती, त्याला देशभरातून विरोध झाला. या तरतुदीवर फेरविचार करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. तत्पूर्वी हे तीनही कायदे १ जुलैपासून देशात लागू केले जाणार, असे केंद्र सरकारने शनिवारी (२४ फेब्रुवारी) जाहीर केले. ही तीन विधेयके ब्रिटिश काळातील अनुक्रमे भारतीय दंड संहिता (IPC) (१८६०), फौजदारी प्रक्रिया संहिता (CRPC) (१८८२) व भारतीय पुरावा कायदा (१८७२) या कायद्यांची जागा घेणार आहेत.**

मागच्या हिवाळी अधिवेशनात सुधारीत तीनही कायद्यांना लोकसभा आणि राज्यसभेने मंजुरी दिली. तसेच २५ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही या कायद्यांना संमती देऊ केली. मागच्याच महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते की, टप्प्याटप्प्याने हे कायदे केंद्रशासित प्रदेशातही लागू केले जाणार आहेत. जानेवारी महिन्यात देशभरातील काही वाहतूक संघटनांनी नव्या कायद्यातील हिट अँड रन तरतुदीबाबत आंदोलन केले होते. निष्काळजीपणामुळे किंवा भरधाव वाहन चालवित असताना कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यास आणि संबंधित वाहन चालकाने तिथून पळ काढल्यास त्याला १० वर्षांचा तुरुंगवास आणि मोठा दंड भरावा लागणार होता. वाहतूक संघटनांनी देशभरातील वाहतूक अडवून तीव्र आंदोलन केल्यानंतर केंद्र शासनाने या कलमातील तरतुदी ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसशी सल्लामसलत करून अंतिम केल्या जातील, असे आश्वासन दिले होते. केंद्र सरकारकडून देशभरात ३००० अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे. हे अधिकारी पोलीस, तपास अधिकारी आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांना नव्या कायद्यातील तरतुदींबाबत मार्गदर्शन करणार आहेत. देशभरात विभागास्तरावर हे प्रशिक्षण पार पडेल. चंदीगडने ज्या पद्धतीचे ऑनलाईन पुरावे साठविण्याचे मॉडेल उभे केले आहे,



त्याची माहिती संबंध देशाला करून दिली जाईल.अमित शाह यांनी ११ ऑगस्ट २०२३ रोजी पहिल्यांदा हे तीन विधेयक मांडले होते. त्यानंतर डिसेंबर महिन्यात हिवाळी अधिवेशनात पुन्हा सुधारित विधेयक सादर करत असताना अमित शाह म्हणाले की, नवे फौजदारी कायदे देशातील जनतेला ब्रिटिशकालीन वसाहतवादाच्या मानसिकतेतून बाहेर काढणार आहेत. आधीचे तीनही फौजदारी कायदे ब्रिटिशांनी तयार केले होते. तेव्हापासून हे कायदे बदलण्यात आले नव्हते. भारत स्वतंत्र होऊनही आजवर आपण इंग्लंडच्या कायद्यानुसार काम करत होतो. हर मॅजेस्टी, लंडन गॅझेट, ब्रिटिश क्राऊन आणि बॅरिस्टर सारख्या संज्ञा या कायद्यामुळे आजही आपण वापरत होतो. नव्या भारतीय न्याय संहिता कायद्यानुसार आता राजद्रोह कलमाची जागा आता देशद्रोह कलम घेणार आहे. जुन्या भारतीय दंड विधान (IPC) मध्ये राजद्रोहाला सरकारविरोधातील कार्य म्हणून सांगितले गेले होते. मात्र बीएनएसमध्ये त्याला बदलून देशद्रोह असे बदलण्यात आले आहेत. सरकारवर कुणी टीका करतो शकतो, मात्र जो देशाच्या सुरक्षेला-अखंडतेला बाधा पोहोचवणारे कृत्य किंवा भाष्य करेल, तो या कलमान्वये गुन्हेगार असेल. केंद्र सरकारने 3 फौजदारी कायदे 1 जुलै पासून लागू होणार असल्याची अधिसूचना शुक्रवारी (दि.24) जारी केली आहे. नवे फौजदारी कायदे भारतीय दंड संहितेची जागा घेणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी डिसेंबर 2023 मध्ये या कायद्यांना मंजूर दिली होती. त्यामुळे या नव्या कायद्यांची निर्मिती झाली होती.

या कायद्यांनुसार, झुंडबळी म्हणजेच 5 किंवा त्यापेक्षा अधिक लोकांच्या समूहाने एकत्रित येत जातीय भेदभावामुळे कोणाचीही हत्या केली तर समुहातील प्रत्येक सदस्याला जन्मठेप म्हणजेच आजीवन कारावासाची शिक्षा दिली जाईल.

शिवाय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्यासही गुन्हेगारांना फाशीची शिक्षा दिली जाऊ शकते. केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी झुंडबळी हा घृणास्पद गुन्हा असल्याचे म्हटले होते. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्यात फाशीची तरतूद असावी, असे मत शाह यांनी संसदेत मांडले होते. केंद्र सरकारने पारित केलेल्या नव्या कायद्यांचा मुख्य उद्देश देशातील फौजदारी न्याय प्रणाली बदलणे हा आहे. त्यामुळे इंग्रजांच्या काळातील कायद्यांमध्ये एकप्रकारे सुधारणा करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे.

### केंद्रशासित प्रदेशातही लागू केले जाणार

नव्या कायद्याने राजद्रोहाचे कायदे नष्ट करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने राजद्रोहाचे कलम 124 (क) रद्द केले आहे. मात्र, राजद्रोहाच्या जागी देशद्रोहाने घेतली आहे. नव्या कायद्यानुसार, राज्यसंस्थेविरोधात गुन्हे करणाऱ्या विरोधात नवे कलमांचा समावेश करण्यात आलाय. या कायद्यान्वये, देशद्रोहामध्ये सशस्त्र बंड, विध्वंसक कारवाया यांसारख्या गुन्ह्यांचा समावेश आहे. देशाची एकता आणि अखंडतेविरोधात कारवाया करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली जाणार आहे. नव्या कायद्यानुसार, तोंडी किंवा लिखित शिवाय सांकेतिक रुपाने देशविरोधी कारवायांना पाठबळ देत देशाची एकता आणि अखंडता धोक्यात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. मागच्या हिवाळी अधिवेशनात सुधारीत तीनही कायद्यांना लोकसभा आणि राज्यसभेने मंजुरी दिली. तसेच २५ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही या कायद्यांना संमती देऊ केली. मागच्याच महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते की, टप्प्याटप्प्याने हे कायदे केंद्रशासित प्रदेशातही लागू केले जाणार आहेत.

# राहुल गांधी जात असलेल्या राज्यात इंडिया आघाडी तुटत आहे

## सगळे मित्र पक्ष आघाडी सोडून चालले आहे : शिवराजसिंह चौहान

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू असताना विरोधकांची इंडिया आघाडी बनण्याआधी तुटत आहे. राहुल गांधी ज्या राज्यात यात्रा घेऊन जात आहेत, तिथली आघाडी तुटत आहे. सगळे मित्र पक्ष आघाडी सोडून चालले आहे, अशी टीका भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी शनिवारी येथे पत्रकार परिषदेत केली.**




काँग्रेसचे नेते राहुल गांधी वर्षभरात ३-४ महिने सुट्टीवर असतात. मोदींनी एकदाही सुट्टी नाही घेतली, अशी तुलना त्यांनी केली.भारत रत्न स्वामिनाथन यांनी दिलेल्या अहवालापेक्षा भाजपने शेतकऱ्यांना अधिक काही दिले आहे. शेतकऱ्यांच्या आंदोलनासंदर्भात चर्चेसाठी सर्वांना दरवाजे उघडे आहेत, असे त्यांनी उत्तर भारतात सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनासंदर्भात विधान केले.ईडीची भीती घालून विरोधकांना भाजपमध्ये घेतले जात आहे असा आरोप केला जात आहे. याबाबत बोलताना चौहान म्हणाले, आम्ही कोणाला आमच्याकडे उचलून आणले नाही. आमच्याकडे ते स्वतःहून येत आहेत. आम्ही कोणाला दरवाजे बंद करू शकत नाही.

### विरोधकांकडे नेता, नीती, नेतृत्व नाही

शरद पवार यांच्याकडे आता काहीही राहिलेले नाही. त्यांचे अस्तित्व काहीही उरले नाही. त्यांना आता बोलायला आणि करायला काहीही शिल्लक नाही, अशी टीका चौहान यांनी केली.गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची सर्व क्षेत्रात प्रगती सुरू आहे. विरोधकांची अवस्था अत्यंत दुबळी आहे. त्यांच्याकडून देशाच्या प्रगतीसाठी कोणतेही काम होणार नाही असा लोकांना विश्वास वाटत आहे. विरोधकांकडे नेता, नीती, नेतृत्व नाही. याउलट भाजपकडे मोदी यांचे द्रष्टे नेतृत्व आहे, अशी तुलनाही चौहान यांनी यावेळी केली. मोदी यांच्या नेतृत्वाखाली शक्तिशाली आणि विकसित भारत बनत आहे. प्रत्येक देश आता भारताचा जयजयकार करत आहे.

## सेल्फी घेण्यावरून चाहत्यांवर भडकले नसीरुद्दीन शाह

ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शाह नेहमीच त्यांच्या वक्तव्यामुळे चर्चेत असतात. अनेकदा ते त्यांच्या वक्तव्यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडतात. अशातच सध्या त्यांचा दिल्ली विमानतळावरचा एक व्हिडीओ समोर आला आहे. ज्यामध्ये नसीरुद्दीन शाह सेल्फीवरून चाहत्यांवर भडकलेले पाहायला मिळत आहेत. नसीरुद्दीन शाह यांचा हा व्हिडीओ 'इस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्रामवर पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत चाहत्यांवर भडकून अभिनेते त्यांना ओरडताना दिसत आहेत. नसीरुद्दीन शाह चाहत्यांना म्हणाले, "तुम्ही लोकांनी खूप चुकीचं काम केलं आहे. तुम्ही माझं डोकं फिरवलं आहे. माणूस कुठेतरी जात आहे तरीही त्याला तुम्ही सोडत नाहीत. तुम्ही समजून का घेत नाहीत?"नसीरुद्दीन शाह यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. अनेक नेटकरी त्यांना या व्हिडीओवरून ट्रोल करत आहेत. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "आपण खरंच यांना महत्व देणं बंद केलं पाहिजे." तसेच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, "अतिशय उद्धट वागणूक आहे. प्रेक्षकांमुळे ते स्टार झाले आहेत, हे त्यांनी विसरू नये." तर तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, "कॅमेरा पाहात लगेच हे भूमिकेत येतात. व्वा काय परफॉर्मेन्स आहे."दरम्यान, जरी अनेकांनी नसीरुद्दीन शाह यांना ट्रोल केलं असलं तरी बऱ्याच जणांनी त्यांचं समर्थन देखील केलं आहे. "हे त्यांचं वय आहे. बाकी काही नाही. त्यांना एकट सोडा", "नसीरुद्दीन शाह भडकलेत याचा अर्थ ते बरोबर करत आहेत", अशा अनेक प्रतिक्रिया काही नेटकऱ्यांनी त्यांच्या समर्थनार्थ दिल्या आहेत.

## समांथाचा मलेशियामधील बिकिनी लूक

साउथ स्टार समांथा रुथ प्रभू ही 'पुष्पा' चित्रपटातील 'उ अंटवा' गाण्यामुळे घराघरांत पोहोचली. २०१० साली प्रदर्शित झालेल्या 'ये माया चेसावे' या चित्रपटाद्वारे समांथाने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले. त्यानंतर तिने अनेक चित्रपट केले आणि समांथा लोकप्रिय अभिनेत्री ठरली. तिच्या अभिनयातील कामगिरीसाठी अनेकदा तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कारही जाहीर झाला आहे. समांथाने सध्या अभिनय क्षेत्रापासून विश्रांती घेतली असून, मलेशियामध्ये ती व्हेकेशन एन्जॉय करताना दिसत आहे. या ट्रिपचे फोटोज तिने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केले आहेत. तपकिरी रंगाच्या बिकिनीवर समांथाचा बोल्ड लूक पाहायला मिळतोय. निसर्गाचा आनंद घेत समांथा क्वालिटी टाइम स्पेंड करताना दिसत आहे.आजूबाजूची हिरवळ, गर्द झाडीतले घर, सुंदर कमळ असे नैसर्गिक सौंदर्य टिपणारे क्षण समांथाने तिच्या सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या निसर्गरम्य वातावरणात ती मेडिटेशन करतानाही दिसत आहे.'हायेस्ट लव्ह' असे कॅप्शन देत समांथाने हे फोटोज शेअर केले आहेत. या पोस्टवर नेटकऱ्यांनी मजेशीर कमेंट्स केल्या आहेत. एकाने लिहिले, "नागा चैतन्य बाथरूममध्ये रडत असेल." तर दुसऱ्याने लिहिले.

## मी हॉलीवूडमध्ये करेन काम




नेटफ्लिक्सवर ९ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालेल्या 'भक्षक' चित्रपटाच्या यशानंतर भूमी पेडणेकरचं बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये कौतुक होत आहे. या चित्रपटात भूमीने पत्रकाराची भूमिका साकारली होती. आदित्य श्रीवास्तव, संजय मिश्रा, विभा छब्बर यांच्यासह मराठमोळी सई ताम्हणकर यात महत्त्वाच्या भूमिकेत दिसली.अलीकडेच न्यूज १८ ला दिलेल्या मुलाखतीत भूमीने हॉलीवूडमध्ये काम करण्याची इच्छा दर्शवली. भूमी म्हणाली, "मला हॉलीवूडमध्ये काम करण्याची इच्छा आहे. संस्कृती आणि विविधता असणाऱ्या या जगात कलाकारांसाठी महत्त्वाकांक्षी असण्याची ही सर्वोत्तम वेळ आहे. ज्याप्रकारे आजकाल चित्रपट आणि सीरिज बनविले जातात. तसेच विविध भूमिका लिहिल्या जातात त्याप्रकारे कलाकार आता आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम करिअर करू शकतात, असं मला वाटतं."भूमी पुढे म्हणाली की, "भारतीय कलाकार आता आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक चित्रपट आणि सीरिज करत आहेत. उदाहरणार्थ, नेटफ्लिक्सच्या 'वन डे' या सीरिजमधील अंबिका मॉड. ज्या सीरिजला जगभरात खूप प्रेम मिळाले अशा यशस्वी सीरिजमध्ये एका भारतीय मुलीला मुख्य भूमिकेत पाहणे खूप समाधानकारक आहे."आजकाल जर एखादं पात्र विशिष्ट प्रदेशातील असेल तर त्या पात्रासाठी निर्माते भारत किंवा इतर देशातील कलाकार निवडतात. जर भूमीला आंतरराष्ट्रीय प्रोजेक्ट्समधून समाधान आणि आनंद मिळत असेल तर ती नक्कीच असे प्रोजेक्ट्स निवडेल, असं भूमी म्हणाली.दरम्यान, भूमीचा 'भक्षक' चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला असून याचे दिग्दर्शन पुलकितने केले आहे. हा चित्रपट २०१८च्या मुझफ्फरपूर शेल्टर होम केसवर आधारित आहे . भूमीच्या आगामी चित्रपटाबाबत सांगायचं झाल्यास, 'मेरे हजबन्ड की बीवी' चित्रपटात भूमी,अर्जून कपूर आणि रकुल प्रीत सिंग प्रमुख भूमिका साकारणार आहेत.

## 'आर्टिकल 370'ने मोडला 'द काश्मीर फाइल्स'चा रेकॉर्ड




अभिनेत्री यामी गौतम धरचा 'आर्टिकल ३७०' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासूनच हा चित्रपट चर्चेत होता अन् प्रेक्षकांची याला पसंतीही मिळाली. प्रेक्षक हा चित्रपट कधी प्रदर्शित होणार याची आतुरतेने वाट बघत होते. पंतप्रधान मोदींनीही या चित्रपटाचं कौतुक केलं. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. इतर चित्रपटांच्या मानाने याला पहिल्याच दिवशी मिळालेलं बुकिंग हे फारच उत्तम आहे.इंडस्ट्री ट्रॅकर 'सॅकनिल्क'च्या रीपोर्टनुसार या चित्रपटाने पहिल्याच दिवशी ५.७५ कोटींचा व्यवसाय केला आहे. आदित्य सुहास जांभळे दिग्दर्शित या चित्रपटाला ४२.८% बुकिंग मिळालं असून जयपुर, पुणे, दिल्ली, चेन्नई या शहरांमध्ये प्रेक्षकांनी तिकीटबारीवर चांगलीच गर्दी केल्याचं स्पष्ट झालं आहे. 'आर्टिकल ३७०' या चित्रपटाने विवेक अग्निहोत्री यांच्या 'द कश्मीर फाइल्स' या चित्रपटाचा रेकॉर्ड मोडीत काढला आहे. द कश्मीर फाइल्स या चित्रपटाने रिलीजच्या पहिल्या दिवशी ३.५५ कोटींची कमाई केली होती.या चित्रपटात यामी गौतम, प्रियामणी, अरुण गोविल हे प्रमुख भूमिकेत असून यात यामी एका NIA अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसत आहे, जीला काश्मीरमध्ये कलम ३७० हटवल्यानंतर शांतता प्रस्थापित करण्याची तसेच दहशतवाद्यांची मोहीम हाणून पडायची जबाबदारी देण्यात आलेली आहे. चित्रपटात '३७० कलम' हटवण्यामागचा संघर्ष, काश्मीरचा इतिहास व आतंकवादाची पार्श्वभूमी, राजकीय हस्तक्षेप या सगळ्यावर या चित्रपटातून भाष्य करण्यात आलं आहे.चित्रपटात यामी गौतमसह प्रियामणी, राज जुत्शी, सुमित कौल, राज अर्जुन, असित गोपीनाथ रेडिज, किरण करमरकर, अश्वनी कुमार आणि इरावती हर्षेसारखे मुरलेले कलाकारही प्रमुख भूमिकेत आहेत. यामीचा पती व 'उरी द सर्जिकल स्ट्राइक'सारख्या चित्रपटाचा दिग्दर्शक आदित्य धर यानेच लोकेश धरसह या चित्रपटाची निर्मिती केली आहे.अभिनेत्री यामी गौतम धरचा 'आर्टिकल ३७०' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासूनच हा चित्रपट चर्चेत होता अन् प्रेक्षकांची याला पसंतीही मिळाली.

## बॅडमिंटन खेळत सारा नृत्य करताना दिसतेय सारा





सैफ अली खान आणि अमृता सिंहची मुलगी सारा अली खान हिने 'केदारनाथ' चित्रपटाद्वारे हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केले. सारा सोशल मीडियावर सक्रिय असून, अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील बाबीही ती शेअर करीत असते. अनेकदा ती चुटकुले, शायरी म्हणून चाहत्यांचे मनोरंजन करताना दिसते. सारा अली खान तिच्या आईसारखी म्हणजेच अमृतासारखी दिसते हे सगळ्यांनाच माहीत आहे. परंतु, नुकताच साराने सोशल मीडियावर एक रेट्रो लूक शेअर केला; ज्यात सारा ही तिची आजी शर्मिला टागोर यांच्यासारखी दिसत आहे असे तिचे चाहते म्हणत आहेत.अभिनेत्री सारा अली खानने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक रील शेअर केली; ज्यात सारा १९६० च्या दशकाची आठवण करून देते. 'हमजोली' चित्रपटातील 'ढल गया दिन, हो गयी शाम' या गाण्यावर बॅडमिंटन खेळत सारा नृत्य करताना दिसतेय. यात साराने गुलाबी रंगाची प्रिंटेड जॉर्जेट साडी परिधान केली आहे आणि जुन्या दशकातील अभिनेत्रींसारखी हेअरस्टाईलसुद्धा केली आहे.ज्येष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोर यांच्या गाण्यासह साराने तिच्या रेट्रो लूकचे फोटो इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत. त्याला कॅप्शन देत साराने लिहिले, "काश मैं बन सकती बडी अम्मा थिस इज अ रिअर हार्टफेल्ट तमन्ना." या रेट्रो लूकमधील व्हिडीओमध्ये शर्मिला टागोर यांची नात सारा त्यांच्या जुन्या चित्रपटातील भूमिकांप्रमाणे दिसत आहे. साराच्या या रीलवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत, तिला "ज्युनियर शर्मिला", असेही म्हटले आहे. सारा अली खानच्या आगामी चित्रपटांबद्दल सांगायचे झाल्यास 'मर्डर मुबारक' हा थ्रिलर चित्रपट १५ मार्च २०२३ रोजी प्रदर्शित होणार आहे. त्यामध्ये पंकज त्रिपाठी, करिश्मा कपूर व विजय वर्मा यांसारख्या प्रमुख कलाकारांचा समावेश आहे. सारा 'ए वतन मेरे वतन' चित्रपटातही झळकणार आहे. त्यात सारा स्वातंत्र्यसैनिक उषा मेहता यांची भूमिका साकारणार आहे.

# दुसऱ्या दिवसावर इंग्लंडचे वर्चस्व!

## भारताने 219 धावांवर 7 विकेट्स, बशीर ठरला काळ

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना रांचीत खेळला जात आहे. या कसोटीच्या दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताची धावसंख्या ७ विकेट्स गमावून २१९ धावा केल्या आहेत. अशाप्रकारे भारतीय संघ पहिल्या डावाच्या आधारे इंग्लंडपेक्षा १३४ धावांनी मागे आहे. दिवसाचा खेळ संपला तेव्हा ध्रुव जुरेल आणि कुलदीप यादव नाबाद परतले. ध्रुव जुरेल २९ धावा करून क्रीजवर आहे. तर, कुलदीप यादव १७ धावा करून खेळत आहे. इंग्लंडकडून शोएब बशीरने सर्वाधिक सात विकेट्स घेतल्या.**



भारतीय संघाची सुरुवात खराब झाली कर्णधार रोहित शर्मा दोन धावा करून बाद झाला.. रोहितला अँडरसनने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर शुबमन गिलने यशस्वी जैस्वालसोबत ८२ धावांची भागीदारी केली. रजत पाटीदार पुन्हा एकदा अपयशी ठरला आणि केवळ १७ धावा करू शकला. रवींद्र जडेजा १३ धावा करून बाद झाला. शुबमन, रजत आणि जडेजा यांना शोएब बशीरने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. दरम्यान, यशस्वीने कसोटी कारकिर्दीतील तिसरे अर्धशतक झळकावले. मात्र, ७३ धावा करून तो बशीरचा बळी ठरला. सरफराज १४ धावा करून बाद झाला, तर अश्विन एक धाव करून बाद झाला. या दोघांनाही हार्टलेने बाद केले. रांची कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात यशस्वी जैस्वालने षटकार ठोकताच, इंग्लंडविरुद्धच्या या कसोटी मालिकेतील हा त्याचा २३वा षटकार ठरला. या षटकारासह, तो कसोटीत एकाच संघाविरुद्ध सर्वाधिक षटकार मारणारा दुसरा भारतीय फलंदाज ठरला. याआधी या क्रमांकावर कर्णधार रोहित शर्मा उपस्थित होता, ज्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटीत आतापर्यंत २२ षटकार मारले होते, पण इंग्लंडविरुद्ध २३ षटकार मारून यशस्वीने त्याला तिसऱ्या क्रमांकावर ढकलले आणि स्वतः दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला. भारताकडून एकाच संघाविरुद्ध कसोटीत सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम सध्या सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे, ज्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २५ षटकार ठोकले होते.पहिल्या दिवशी फलंदाजीसाठी उतरलेल्या इंग्लंडच्या संघाकडून जो रुटने शतकी खेळी केली. त्याच्याशिवाय इतर कोणत्याही फलंदाजीला मोठी धावसंख्या उभारता आलेली नाही. इंग्लंडकडून, झॅक क्राऊली 42 चेंडूमध्ये 42, बेन डकेट 21 चेंडूमध्ये 11, जो रुट 226 चेंडूमध्ये 106 (नाबाद) , जॉनी बेयरस्टो 35 चेंडूमध्ये 38, बेन स्टोक्सने 126 चेंडूमध्ये 47 धावा आणि ओली रॉबीनसनने 60 चेंडूमध्ये (नाबाद) 31 धावांचे योगदान दिले आहे. इंग्लंडने पहिल्या दिवसअखेर 7 विकेट्स गमावत 90 षटकात 302 धावा केल्या. जो रुटने या सामन्यात 31 वे शतक पूर्ण केले. रुट 106 धावांवर आणि रॉबिनसर 31 धावा करत नाबाद आहेत. पहिला सेशन पूर्णपणे भारताच्या नावावर राहिला होता. सुरुवातीच्या सेशनमध्येच टीम इंडियाने इंग्लंडचा निम्मा संघ तंबूत धाडला होता. तर दुसऱ्या सेशनमध्ये इंग्लंडने वापसी केली. दुसऱ्या सेशनमध्ये इंग्लंडने 86 धावा कुटल्या. तर तिसरे सेशनमध्ये दोन्ही संघाने तुल्यबळ कामगिरी केली. भारताने 2 विकेट्स पटकावल्या.

### जैस्वालची एकाकी झुंज

» पहिल्या डावात 353 धावा केल्यानंतर इंग्लंडचा संघ गोलंदाजीसाठी उतरला. त्यानंतर टीम इंडियाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. शोएब बशीरने 4 विकेट्स पटकावत टीम इंडियाला धक्के दिले आहेत. त्यामुळे टीम इंडिया रांची कसोटीत 134 धावांनी पिछाडीवर आहे. भारताकडून यशस्वी जैस्वाल शिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला चांगली कामगिरी करता आलेली नाही. जैस्वालने 71 धावा करत टीम इंडियाकडून एकाकी झुंज दिली आहे. जैस्वाल शिवाय शुभमन गिलने 38 धावांचे योगदान दिले आहे. तर ध्रुव जुरेल 30 धावा करुन नाबाद क्रिजवर आहे. भारताकडून, यशस्वी जैस्वाल 117 चेंडूमध्ये 73, शुभमल गिल 65 चेंडूमध्ये 38 धावा, रजत पाटीदार 42 चेंडूमध्ये 17 धावा आणि सरफराज खानने 53 चेंडूमध्ये 14 धावांचे योगदान दिले. शिवाय, रवींद्र जाडेजा 12 धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मा केवळ 2 धावा करत तंबूत परतला. टीम इंडियाकडून केवळ यशस्वी जैस्वालला चांगली कामगिरी करता आली. इंग्लंडकडून शोएब बशीरने 4, टॉम हर्टलीने 2 तर जेम्स अँडरसनने 1 विकेट पटकावली. भारताकडून ध्रुव जुरेल आणि कुलदीप यादव नाबाद आहेत.

# भारत-पाकिस्तान सामन्याच्या तिकीटांसाठी प्रचंड मागणी

## सामन्याच्या तिकीटांसाठी तब्बल 200 पट अधिक लोकांनी नोंदणी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धा सुरू होण्यास अद्याप तीन महिन्यांहून अधिक कालावधी आहे, परंतु या विश्वचषकाअंतर्गत भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळला जाणारा शानदार सामना पाहण्यासाठी गर्दी होत आहे. एका अहवालानुसार, आयसीसीने जाहीर केलेल्या तिकिटांपेक्षा २०० पट अधिक लोकांनी तिकीट मिळविण्यासाठी नोंदणी केली आहे. त्यामुळे लाखो लोक अमेरिकेत खेळलेली ही महायुद्ध पाहण्यापासून वंचित राहतील.**



आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेतील भारत-पाकिस्तान सामन्यासाठी चाहते खूप उत्सुक आहेत. एका अहवालानुसार, आयसीसीने जाहीर केलेल्या तिकिटांपेक्षा २०० पट अधिक लोकांनी तिकीट मिळविण्यासाठी नोंदणी केली आहे. चाहत्यांना कोणत्याही किंमतीत या सामन्याची तिकिटे खरेदी करायची आहेत आणि त्यांना स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहायचा आहे. टी-२० विश्वचषक सुरू होण्यास अद्याप तीन महिन्यांहून अधिक कालावधी आहे. मात्र वर्ल्डकपसाठी तिकीट खरेदीसाठी आतापासूनच चढाओढ सुरू झाली आहे.लाइव्ह मिंटने दिलेल्या वृत्तानुसार, आयसीसीने विश्वचषकाच्या तिकिटांची संख्या जाहीर केली. या तिकिटांवर २०० पट अधिक लोकांनी नोंदणी केली आहे. यामुळे बहुतेक लोकांची निराशा होईल. विशेष म्हणजे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना न्यूयॉर्कमध्ये होणार आहे. या स्टेडियममध्ये फक्त ३४ हजार प्रेक्षक बसून सामना पाहू शकणार आहेत.

### विश्वचषकाचे 16 सामने अमेरिकेत

» स्टेडियमची प्रेक्षक क्षमता एक लाखापर्यंत वाढवली तरी सामन्याची सर्व तिकीट विकली जातील. कारण भारत विरुद्ध पाकिस्तान सामना पाहण्यासाठी चाहत्यामध्ये प्रचंड क्रेझ असते. अहवालानुसार, टी-२० विश्वचषकाचे १६ सामने अमेरिकेत होणार आहेत, त्यापैकी ९ सामन्यांची कोणतेही तिकीटं शिल्लक नाहीत. टी-२० विश्वचषक यूएसएचे मुख्य कार्यकारी अधिकारी ब्रेट जोन्स म्हणाले की, 'प्रत्येक विश्वचषकात भारत आणि पाकिस्तानचे सामने खूप रोमांचक होतात. मला वाटते की हे दोन देश युनायटेड स्टेट्समध्ये येताना पाहणे खरोखर छान आहे.' ते म्हणाले की, भारत आणि पाकिस्तान त्यांचे सर्व गट सामने युनायटेड स्टेट्समध्ये खेळतील आणि निश्चितपणे देशात राहणारे भारतीय सामन्यांसाठी प्रचंड गर्दी करतील.